**उच्च शिक्षण संचालनालय व त्यांच्या**
**अधिपत्याखालील शासकीय**
**कार्यालयातील पदांचा आढावा**
सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक डीएचई १००८/(०९/०८)/मशि-६,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३ डिसेंबर, २००८.

संदर्भ - १. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक असंक-१००१/प्र.क्र. २९/२००१/ वित्तीय सुधारणा, दि. १०/९/२००१.
२. संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/पदांचा आढावा/ २००५-०६/ प्रशा-२/२८८९ दि.१०.४.२००८.
३. उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक ३१.१.२००८ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :** शासनाने संदर्भ क्र.१ अन्वये शासकीय पदांचा आढावा घेण्याकरीता निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने उच्च शिक्षण संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयातील पदांचा आढावा घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. या प्रस्तावास संयुक्त सचिव समितीने दिनांक १२.६.२००७ व उच्चस्तर सचिव समितीने दिनांक ३१.१.२००८ च्या बैठकीमध्ये मान्यता दिली. त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत येणा-या पदांचा खालीलप्रमाणे आढावा मंजूर करण्यात आला.

| मूळ मंजूर पदे | प्रत्यार्पित पदे | नवीन निर्माण करावयाची पदे | सुधारित आकृतीबंधानुसार अनुज्ञेय पदे |
|---|---|---|---|
| २९६८ | ७३८ | १६३ | २३९३ |

वरील आढाव्याबाबत मूळ मंजूर २९६८ पदातील अतिरिक्त ठरलेली ७३८ पदे प्रत्यार्पित केल्यानंतर व नवीन निर्माण करावयाची १६३ पदे विचारात घेतल्यानंतर २३९३ पदांचा सुधारित आकृतीबंध उच्चस्तर सचिव समितीने मंजूर केलेला आहे. मात्र १६३ नवीन पदांना वित्त विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १०.९.२००१ नुसार मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे. मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतरच ही पदे भरण्याची कार्यवाही करता येईल. ही मान्यता मिळविण्यासाठी वेगळी कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील बाबी लक्षात घेता २३९३ - १६३ = २२३० पदांबद्दल सर्व कार्यवाही करता येते व याकरीता खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे

**शासन निर्णय :**

१. **शिक्षकीय व शिक्षकेतर पदे**

- उच्च शिक्षण संचालनालयातील अधिपत्याखालील कार्यालयात पुढीलप्रमाणे शिक्षक/ शिक्षकेतर पदे २२३० (दोन हजार दोनशे तीस) अस्तित्वात राहतील.



Scanned by CamScanner

| अ.क्र. | उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत विभाग | आकृतीबंधानुसार मंजूर पदे | |
|---|---|---|---|
| | | शिक्षकीय पदे * | शिक्षकेतर पदे S |
| १ | उच्च शिक्षण संचालनालय व सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयातील शिक्षकीय पदे | १० | २८६ |
| २ | शासकीय महाविद्यालयातील शिक्षकीय पदे | ५१८ | ३६५ |
| ३ | शासकीय अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकीय पदे | १३२ | १२४ |
| ४ | शासकीय विज्ञान संस्थेतील शिक्षकीय पदे | ३९१ | २०२ |
| ५ | भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रांमधील शिक्षकीय पदे | ०४ | ३३ |
| ६ | संस्थगीत पदे (Kept in abeyance) | ३९ | -- |
| ७. | वरीष्ठ लेखा परीक्षक कार्यालयातील शिक्षकेतर पदे | -- | १६ |
| ८. | शासकीय वसतिगृहातील शिक्षकेतर पदे | -- | ९८ |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकाशन समितीतील शिक्षकेतर पदे | -- | ०७ |
| १०. | महात्मा फुले चरीत्र साधने प्रकाशन समितीतील शिक्षकेतर पदे | -- | ०५ |
| | एकूण शिक्षकीय पदे | १०९४ | ११३६ |

* प्रपत्र 'अ' व S प्रपत्र 'ब'सोबत जोडली आहेत.

१.१ ही पदे जर रिक्त असतील तर ती भरण्याची कार्यवाही संबंधितांनी तातडीने सुरु करावी.

१.२ या २२३० मंजूर पदांतील ३९ पदे संस्थगित पदे म्हणून मंजूर करण्यात येत आहेत. सदरची पदे भरतांना संचालकांनी शासनाची पूर्वमंजूरी प्राप्त करुन ही पदे भरावीत.

२. **व्यपगत झालेली पदे (७३८ )**
प्रपत्र 'क' मध्ये नमुद ७३८ पदे या आदेशान्वये रद्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२.१ सदर ७३८ पदांपैकी ज्या ४०० पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत त्या कर्मचा-यांना वेतन मिळावे म्हणून ४०० अधिसंख्य पदे निर्माण करण्यासही याव्दारे मान्यता देण्यात येत आहे. या ४०० पदावरील कर्मचारी जसजसे सेवानिवृत्त झाल्याने/मृत झाल्याने/ अन्य कारणाने पदे रिक्त होतील तेव्हापासून सदर अधिसंख्य पदेही नष्ट होतील. सदरची पदे भरण्यात येऊ नयेत. अधिसंख्य पदांवरील कर्मचा-यांचे सविस्तर आदेश संचालक, उच्च शिक्षण निर्गमित करतील.

२.२ प्रपत्र 'क' मधील प्रत्यार्पित ७३८ पदापैकी ४०० पदावर कार्यरत कर्मचा-यांना अतिरीक्त संवर्ग कक्षाकडे वित्त विभागाच्या दिनांक १०/९/२००१ च्या शासन निर्णयानुसार वर्ग करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी.

३. हा आकृतीबंध खालील निकष लावून पूर्ण केलेला आहे.
- शिक्षकांच्या कार्यभाराचे निकष शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२९८/(४६१९)/विशि-४, दिनांक ११/१२/१९९९ नुसार.
- शासकीय महाविद्यालये/शासकीय अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२२९९/(४७९५)/विशि-४, दि. २६/८/१९९९ मधील निकषानुसार .



४. पहारेकरी , चौकीदार, स्वच्छक, सफाईगार, माळी ही २२६ पदे आढाव्यात समर्पित करण्यात आली आहेत. सदर २२६ पदांची कामे कंत्राटी पध्दतीवर करुन घेण्याचे अधिकार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात येत आहे. सदर पदे नियमित वेतनश्रेणीतील वेतनावर नियुक्त न करता सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रोजंदारीच्या कर्मचा-यांना मिळणा-या दरावर नियुक्त्या करुन त्या पदाचे काम कंत्राटी पध्दतीने देण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७२९/०८ विसु-१, दिनांक ६/१०/२००८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००८१०२२१८०१५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अरविंद चौधरी)
सहसचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
३. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये/संस्था
४. संचालक, सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे,
५. वसतिगृह प्रमुख, सर्व शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय वसतिगृहे
६. अधिक्षक, शासकीय महाविद्यालये वसतिगृहे, मुंबई
७. अधिक्षीका, सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, तेलंग स्मारक वसतिगृह, मुंबई
८. सदस्य सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, शासकीय बॅरक नंबर १८, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी व उपकोषागार अधिकारी,
११. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
१२. मा. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४. वित्त विभाग (व्यय - ५)/ अर्थसंकल्प/ वित्तीय सुधारणा
१५. कार्यासने मशि व विशी, उच्च व तंत्रशिक्षण
१६. निवड नस्ती मशि-६.



Scanned by CamScanner

**तक्ता क्र.२**

शासकीय महाविद्यालयातील शिक्षक पदांचा गोषवारा

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | एलफिस्टन महाविद्यालय, मुंबई | इस्माईल युसुफ महाविद्यालय मुंबई | शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई | सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सिडनहॅम व्यवस्था-पनीय व उद्योजकीय शिक्षण व संशोधन संस्था , मुंबई | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | प्राचार्य/संचालक | १६४००-४५०-२२४०० | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ९ |
| २ | प्राध्यापक | १६४००-४५०-२२४०० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| ३ | प्रपाठक | १२०००-१८३०० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | २ |
| ४ | वरिष्ठ अधिव्याख्याता | ८०००-२७५-१३५०० | ५९ | ५० | ५१ | ७१ | १३ | २० | २ | ६५ | १२ | ३४३ |
| ५ | कनिष्ठ अधिव्याख्याता | ७२२५-२२५-११०५० | १८ | १३ | १६ | ४० | ० | ९ | ० | ५ | ० | १०१ |
| ६ | शारिरीक शिक्षण निदेशक | ८०००-२७५-१३५०० | १ | १ | १ | २ | ० | ० | ० | १ | १ | ७ |
| ७ | ग्रंथपाल | ८०००-२७५-१३५०० | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ९ |
| | एकूण | | ८० | ६६ | ७० | ११५ | १५ | ३१ | ७ | ७३ | १५ | ४७२ |



Scanned by CamScanner

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये महाविद्यालये/ संस्था यातील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः मुवाढ-२०१५/(१००/१५)/ मशि १,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २०.०३.२०१५.

वाचा :-

१. शासन निर्णय क्र.असंक १००४ / प्र.क्र.१२ (भाग २)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.४ ऑक्टोबर, २००४
२. शासन निर्णय क्र. मुवाढ-२०१४/(३३/१४)/ मशि १, दि.१०.०४.२०१४
३. शासन निर्णय क्र. वसती-२०१०/ प्र.क्र. २२८/१०मशि-२, दि.२०/०४/२०१३
४. शासन निर्णय क्र. आयएएस-२००९/ प्र.क्र.३५/०९/मशि-२, दि.१७/०६/२०१३
५. शासन निर्णय क्र. शुल्क -२०१२/ प्र.क्र.१८३/१२ मशि-२ दि.५/०७/२०१३
६. शासन निर्णय क्र. पापंमं-२०१२/(१२/१२)मशि-१ दि. २९/०१/२०१४
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.उशिसं/२०१४-१५/मुदतवाढ/ प्रशा-२/ १८८५, दि. २५.०२.२०१५ चे पत्र.

**शासन निर्णय:-**

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची कार्यालये, शासकीय महाविद्यालये/शासकीय विज्ञान संस्था/ शासकीय न्याय सहाय्यक विज्ञानसंस्था/ भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व परिक्षा प्रशिक्षण केंद्रे व शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय वसतिगृहे, सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, तेलंग स्मारक मुलींचे वसतीगृह, शासकीय वसतिगृहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले व राजर्षि शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई यामध्ये एकुण १६४४ पूर्णवेळ व ९४ अर्धवेळ अस्थायी पदांना वरील संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये दि. २८/०२/२०१५ पर्यंत चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली होती. आता खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे उच्च शिक्षण

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | भांडारपाल | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| १५ | प्रयोगशाळा सहाय्यक | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| १६ | अधीक्षक | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८<br>शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(९७/०८)/मशि-६ दिनांक- १३.०२.२००९ |
| | **एकुण पदे** | ३० | |
| | **६ शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली** | | |
| १ | प्राचार्य | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| २ | सहाय्यक प्राध्यापक रसायनशास्त्र | ३ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक वनस्पतीशास्त्र | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक गणित | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| ५ | सहाय्यक प्राध्यापक भौतिकशास्त्र | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| ६ | सहाय्यक प्राध्यापक प्राणिशास्त्र | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| ७ | महाविद्यालयीन ग्रंथपाल | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(९७/०८)/मशि-६ दिनांक- १३.०२.२००९ |
| ८ | महाविद्यालयीन शारिरिक शिक्षण संचालक | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| ९ | मुख्यलिपिक | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| १० | वरिष्ठ लिपिक | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(९७/०८)/मशि-६ दिनांक- १३.०२.२००९ |
| ११ | प्रयोगशाळा सहाय्यक | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(९७/०८)/मशि-६ दिनांक- १३.०२.२००९ |
| १२ | कनिष्ठ लिपिक | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| १३ | ग्रंथालय लिपिक | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| १४ | शिपाई | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |
| १५ | ग्रंथालय परिचर | १ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(९७/०८)/मशि-६ दिनांक- १३.०२.२००९ |
| १६ | प्रयोगशाळा परिचर | ४ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(९७/०८)/मशि-६ दिनांक- १३.०२.२००९ |
| | **एकुण पदे** | २६ | |
| | **७ शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा** | | |
| १ | सहाय्यक प्राध्यापक | २ | शासन निर्णय क्रमांक डीएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि. ३.१२.२००८ |

Scanned by CamScanner

उच्च शिक्षण संचालनालय ...
मंजूर शिक्षकीय पदांचे कार्यभारानुसार फेरवाटप.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.एससीपी-२००९/(३४३/०९)/मशि-१
मंत्रालय विस्तारभवन, मुंबई-४०००३२.
दि. २९ जून २०१०.

वाचा: शासन निर्णय क्र.डिएचई-१००८/(०९/०८)/मशि-६, दि.३ डिसेंबर, २००८.

प्रस्तावना :- उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या पदांचा आढावा घेऊन संदर्भाधीन दिनांक ३/१२/२००८ च्या आदेशान्वये सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. या आकृतीबंधानुसार शिक्षकीय पदांची पदसंख्या १०९४ अशी आहे. यापैकी ३९ शिक्षकीय पदे संस्थगित ठेवण्यात आली आहेत. संदरहू संस्थगित ३९ पदे व कार्यरत पूर्ण/अर्धवेळ शिक्षकीय पदे कार्यभारानुसार रुपांतरित करुन आढाव्याच्या १०९४ या पदसंख्येच्या मर्यादेत फेरवाटप करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यभारानुसार पदांचे फेरवाटप करण्याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या शासकीय महाविद्यालय / शिक्षण संस्था व शासकीय अध्यापक महाविद्यालयातील पदांच्या आकृतीबंधास शासन निर्णय दिनांक ३ डिसेंबर, २००८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. आकृतीबंधानुसार मंजूर १०९४ एवढया मंजूर शिक्षकीय पदापैकी शासकीय महाविद्यालय व शासकीय संस्था मधील पदांचे कार्यभारानुसार सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे फेरवाटप करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५२/२०१०/विसु-१, दिनांक ५/५/२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा सांकेतांक क्रमांक २०१००६२९१९०८३६०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

र.बा. मयेकर

(र.बा. मयेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य
३. प्राचार्य/ संचालक, सर्व शासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये/ संस्था.

Scanned by CamScanner

संस्था/महाविद्यालयाचे नांव- शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली
शासन निर्णय क्र.एससीपी-२००९/(३४३/०९)/मशि-१, दिनांक २९/०६/[illegible]

प्राध्यापक-०
प्रपाठक-०
अधिव्याख्याता-११
ग्रंथपाल-१
शारिरिक शिक्षण निर्देशक-१

| अ.क्र. | विषय | अधिव्याख्याता |
|---|---|---|
| १ | वनस्पतीशास्त्र | २ |
| २ | भौतिकशास्त्र | २ |
| ३ | प्राणिशास्त्र | २ |
| ४ | रसायानशास्त्र | ३ |
| ५ | गणित | २ |
| | एकूण | ११ |
| १ | ग्रंथपाल | १ |
| २ | शारीरिक शिक्षण निर्देशक | १ |

संस्था/महाविद्यालयाचे नांव- शासकीय विज्ञान संस्था नागपूर (वरिष्ठ विभाग)
शासन निर्णय क्र.एससीपी-२००९/(३४३/०९)/मशि-१, दिनांक २९/०६/२०१० नूसार मंजूर पदे

प्राध्याक-८
प्रपाठक-२०
अधिव्याख्याता-५२
ग्रंथपाल-१
शारिरिक शिक्षण निर्देशक-२

| अ.क्र. | विषय | प्राध्यापक | प्रपाठक | अधिव्याख्याता |
|---|---|---|---|---|
| १ | वनस्पतीशास्त्र | ०१ | ०३ | ८ |
| २ | भौतिकशास्त्र | ०२ | ०५ | १२ |
| ३ | प्राणीशास्त्र | ०१ | ०३ | ८ |
| ४ | रसायनशास्त्र | ०२ | ०५ | १६ |
| ५ | सांख्यिकी | ०१ | ०२ | ५ |
| ६ | गणित | ०१ | ०२ | ३ |
| | एकूण | ८ | २० | ५२ |
| १ | ग्रंथपाल | ०० | ०० | १ |
| २ | शारिरिक शिक्षण निर्देशक | ०० | ०० | २ |

(डॉ.रा.वि.किर्दक)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

Final pade[illegible]

Scanned by CamScanner